SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA
PHONE :EPABX-2690571(10 lines), 2693643(9 lines), 2693730 (9 lines)
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र
फॅक्स : 0091–0231–691533 व 0091 – 0231–2692333
नॅक विभागाचा दुरध्वनी 0231–2609087 E-mail : iqac@unishivaji.ac.in
Website : www.unishivaji.ac.in

Estd. 1962
" A++" Accredited by
NAAC (2021) With CGPA 3.52

---

संदर्भ क्र. एसयु/अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष/स्कुल कनेक्ट (NEP कनेक्ट)/१६९ दिनांक : २३/०१/२०२४

प्रति,

मा. प्राचार्य /संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीमुळे होणा–या विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठस्तरावरून स्कुल कनेक्ट (NEP कनेक्ट) हे संपर्क अभियान राबविण्याबाबत...

महोदय / महोदया,

आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त विषयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून आलेला शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण – २०२४/प्र.क्र.०१/विशि ३ दिनांक ०५ जानेवारी, २०२४ सोबत जोडला असून त्यामध्ये नमूद केलेनुसार राज्यातील महाविद्यालयांमधील स्थुल नोंदणी प्रमाण वाढविण्यासाठी व राज्यात राबविण्यात येणा–या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० धोरणामुळे होणा–या शैक्षणिक बदलांबाबत व त्यांच्या सकारात्मक परिणामांबाबतची माहिती होण्यासाठी 'स्कूल कनेक्ट ( NEP कनेक्ट) हे संपर्क अभियान सर्व अकृषि विद्यापीठ स्तरावर दि. १५ जानेवारी ते ३१ जानेवारी, २०२४ या कालावधीमध्ये राबविण्याबाबत कळविले आहे.

त्यानुसार विद्यापीठामार्फत जिल्हानिहाय २५ अशी एकूण ७५ महाविद्यालयांना सदरचे संपर्क अभियान राबविण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि ब–याच महाविद्यालयांकडून सदरचे संपर्क अभियान राबविण्याबाबत विचारणा होत आहे. त्यामुळे अशा पध्दतीने स्वयंस्पूर्तीने ज्या महाविद्यालयांना 'स्कूल कनेक्ट ( NEP कनेक्ट) हे संपर्क अभियान आपल्या महाविद्यालयामध्ये राबवावयाचे आहे. त्यांनी उपरोक्त नमूद शासन निर्णय दि. ०५ जानेवारी, २०२४ नुसार सदरचे संपर्क अभियान राबविण्यास हरकत नाही.

'स्कूल कनेक्ट ( NEP कनेक्ट) या संपर्क अभियानाच्या अनुषंगाने माहिती / अहवाल / शासन निर्णय विद्यापीठाच्या संकेतस्थळावर University Home Page ⟹ IQAC ⟹ School Connect (NEP Connect) उपलब्ध करून देण्यात आले आहे.

Link for Organizing Colleges - https://forms.gle/DE6K9tACkhJSdbtJ9

कळावे,

आपला विश्वासू

संचालक
अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष